**मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया पुर्व व शस्त्रक्रियेनंतर करण्यात येणाऱ्या डायलिसीस या उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरविणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन परिपत्रक क्र. एसएसएन- १००६ /(५१०/०६)/ माशि-२,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - २४ एप्रिल, २००७

वाचा- १) शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग,
क्र.एसएसएन- २०८९/३/माशि-२, दिनांक १२ मे, १९८९
२) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग,
क्र.एसएसएन-२६२५/२८०२३/(५७४) /माशि-२,
दिनांक १२ डिसेंबर, १९९५
३) शासन निर्णय,सार्वजनिक आरोग्य विभाग,
क्र.वैखप्र-२००६/ प्र.क्र.१९५/ आरोग्य-३, दिनांक १३ जुलै, २००६

**शासन परिपत्रक** - शासनाने राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा उच्च माध्यमिक शाळा, अध्यापक विद्यालये इत्यादी मधील शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी यांना उपरोक्त संदर्भिय दिनांक १२ मे, १९८९ अन्वये वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना लागू केली. उपरोक्त संदर्भिय दिनांक १३ जुलै, २००६ च्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभागाने शासकीय कर्मचारी/ अधिकारी व त्यांच्या कुटुंबीयांनी मुत्रपिंड निकामी झाल्यानंतर, मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रीयेपुर्वी व अयशस्वी शस्त्रक्रीयेनंतर डायलिसिस करवून घेतल्यास त्यावरील शासकीय अथवा खाजगी रुग्णालयातील वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय ठरविण्यात आली आहे. तसेच, याच शासन निर्णयान्वये प्रतिपूर्ती प्रकरणांची छाननी करुन शिफारस करण्यासाठी समित्या कार्यान्वित केल्या आहेत.

२. शासन या परिपत्रकान्वये अशा सूचना देत आहे की शासन निर्णय,सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक वैखप्र- २००६/१९५/ आरोग्य-३, दिनांक १३ जुलै, २००५ मध्ये नमूद करण्यात आलेल्या विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित

माध्यमिक शाळांतील शिक्षक- शिक्षकेतर कर्मचा-यांनी मूत्रपिंड निकामी झाल्यानंतर, मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रियेपूर्वी व अयशस्वी शस्त्रक्रियेनंतर डायलिसिस करवून घेतल्यास त्यावरील वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती त्यांना देय राहील.

हे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेताक क्रमांक २००७०४२४१५०९२२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( श्री. भि. होटकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक ( प्राथमिक )(माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी ( माध्यमिक)
शिक्षण निरीक्षक (दक्षिण /उत्तर /पश्चिम)
अधिदान व लेखा अधिकारी मुंबई / निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
महालेखापाल -१ / २ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
महालेखापाल -१ / २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र , मुंबई / नागपूर
शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने
सार्वजनिक आरोग्य विभाग / आरोग्य-३
निवड धारिका (माशि-२ )